# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००१

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in


पत्र क्र. : नाविमं/प.उ.मा./३१८१
नागपूर, दिनांक : ०४ /१०/२०२४

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :–फेब्रु./मार्च–२०२५ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याबाबतच्या सुचना.

संदर्भ :–१) राज्य मंडळ,पुणे यांचे पत्र क्र./परीक्षा–०३/३७७३ दिनांक २७/०९/२०२४ चे G-Mail द्वारे प्राप्त झालेले सुचना.
२) गणकयंत्र विभाग राज्य मंडळ, पुणे यांचे दिनांक ०१/१०/२०२४ चे G-Mail द्वारे प्राप्त झालेले पत्र.

फेब्रु./मार्च–२०२५ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याबाबतच्या सुचना खालील प्रमाणे आहेत.

१. फेब्रुवारी–मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाचे नव्याने तयार करण्यात आलेले संकेतस्थळ www.mahahsscboard.in वर Institute Login या Tab मधून भरावयाची असून त्याचा Login ID व Password हा मार्च २०२४ परीक्षेचे प्रात्याक्षिक/अंतर्गत मूल्यमापनाचे गुण भरण्यासाठी देण्यात आलेला Login ID व Password आहे तोच राहील.

२. फेब्रुवारी–मार्च २०२४ परीक्षेसाठी प्रात्याक्षिक गुण भरण्यासाठी तयार करण्यात आलेल्या Maker Checker या दोन्ही Login मधून आवेदनपत्रे भरता येतील, परंतू Pre-List काढणे, Challan तयार करणे इत्यादी कामे फक्त प्राचार्य/मुख्याध्यापक यांचे Checker Login (Sxxxxxxx_1) मधूनच करता येतील.

३. कोणत्याही User चा पासवर्ड विसरला असल्यास Login Page वर Forget Password ची लिंक देण्यात आलेली असून त्याद्वारे Registered Mobile वर प्राप्त झालेले OTP दिल्यास Registered Mobile व E-Mail वर Message द्वारे नवीन Password उपलब्ध होईल.

४. क.महाविद्यालय/शाळांच्या प्राचार्य/मुख्याध्यापक यांचा मुख्य Login (Sxxxxxxx_1) चा Password विसरला असल्यास तसेच Registered Mobile व E-Mail देखील उपलब्ध नसल्यास संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क करून नविन Mobile No व E-Mail Registered करण्यात येवून विभागीय मंडळामार्फत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून नविन Password Mobile व E-Mail वर Message द्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

५. क.महाविद्यालय/शाळा यांना Registered Mobile/E-Mail ID मध्ये बदल करावयाचा असल्यास संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

६. पुर्नपरीक्षार्थी किंवा CIS विद्यार्थ्याकरीता मागील 3 परीक्षांचा Data उपलब्ध करून दिलेला आहे. विद्यार्थ्यांना त्या त्या परीक्षेचा बैठक क्रमांक टाकून त्यांची जुनी माहीती उपलब्ध करून घेता येईल. CIS विद्यार्थ्यांसाठी त्यांचा बैठक क्रमांक त्या वर्षाच्या Online Data मध्ये उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याशिवाय आवेदनपत्रे भरता येणार नाही. मागील परीक्षेच्या बैठक क्रमांकावरून प्राप्त झालेल्या माहितीची पडताळणी करून आवश्यक त्या दुरूस्त्या करूनच आवेदनपत्र Submit करावे.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी :–

1) मा. सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादाराने अग्रेषित.
2) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादाराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.